# प्रथम वर्ष कला

# मानवी भूगोल

# सत्र 2

# 3.वसाहती (Settlements)

मानवी वसाहतींचा अभ्यास हा वस्ती भूगोलाच्या अभ्यासाचा एक भाग आहे. भूगोल विषयाची शाखा मानवी भूगोल या शाखेच्या अंतर्गत वस्ती भूगोलाचा अभ्यास केला जातो. या विषयात मानवाला केंद्रस्थानी मानूनच सर्व भौगोलिक घटकांचा अभ्यास केला जातो. मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा आहेत. त्यातील निवारा किंवा वसाहत या मूलभूत गरजेचा भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच मानवी वसाहत हा मानवी भूगोलाच्या अभ्यासाचा एक महत्वाचा भाग आहे. त्या गरजेतूनच वसाहत किंवा अधिवास भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्त्वपूर्ण शाखा विकसित झाली आहे. पुढील व्याख्येवरूनच आपल्याला या विषयाची सामान्य कल्पना येते.

"वस्ती किंवा अधिवास भूगोल ही मानवी भूगोलाची अशी शाखा आहे की ज्या शाखेत मानवाने पृथ्वीच्या विशिष्ट भागावर वसविलेल्या वसाहतींचा अर्थशोधी अभ्यास केला जातो."

या अभ्यासात आद्य मानवाने वसाहती स्थापण्यासाठी केलेल्या प्रयत्नांपासून आधुनिक जगातील महानगरापर्यंतच्या (Metropolitan Cities) सर्व वसाहतींचा समावेश होतो.

**ग्रामीण वसाहतींचे प्रकार व प्रारूपे**

**(Types and Pattern of Rural Settlements)**

मानवाने पर्यावरणाशी एकरूप होण्यासाठी केलेला पहिला प्रयत्न म्हणजे वसाहत किंवा वस्ती होय. विशिष्ट ठिकाणची वसाहत व तिची रचना ही मानव व पर्यावरण यांच्या संबंधाचे प्रतिबिंब असते. वसाहती या स्थळ व काळ यांच्या गतिमान संबंधामुळे निर्माण होतात

वसाहत किंवा अधिवासाच्या अनेक तज्ज्ञांनी व्याख्या केल्या आहेत. त्यातील डिकिन्सन यांच्या मते

**"शेतवाड्या, गृहसमूह, नगर इत्यादी मानवी समाजास आवश्यक असलेल्या सामाजिक भौगोलिक गोष्टींची क्षेत्रीय व्यवस्था म्हणजे वस्त्या किंवा अधिवास होय."**

"मानवी संस्कृतीचे केंद्रस्थान म्हणूनही मानवी वस्त्या किंवा वसाहतीचा अभ्यास केला जातो."

मानवाच्या प्राथमिक अवस्थेत म्हणजेच सक्षम मानव उत्क्रांत झाल्यानंतर तो अनेक वर्षे पाषाणयुगात फळे व कंदमुळे गोळा करणे, दगडी हत्यारांच्या साहाय्याने शिकार करणे, मासेमारी करणे व त्यातून आपली उपजीविका भागविणे असे भटके जीवन तो जगत होता, नैसर्गिक आपत्ती, हिंस्र श्वापदांपासून संरक्षण, शत्रू टोळ्यांपासूनचा धोका या व अशा अनेक कारणांमुळे त्याने संरक्षित जागा निवडण्याचा प्रयत्न सुरू केला. प्रथम त्याने गुहांचा आश्रयासाठी वापर केला. काळाच्या ओघात कुटुंब टोळ्या, जमात व सामुदायिक जीवनाचा विकास होऊ लागला व निवाऱ्याच्या सुरक्षिततेच्या गरजेतून मानवाने तात्पुरत्या वसाहतींची निर्मिती केली. या तात्पुरत्या वसाहतींमुळेच मानव गटागटाने राहण्यास उद्युक्त झाला. जसजसे मानवाचे गट विकसित होत गेले तसतशी वसाहतींना स्थिरता प्राप्त होऊ लागली. वसाहती स्थिर होत असतानाच शेतीचा विकास होऊ लागला व त्याचबरोबर मानवाने प्राणी पाळण्यास सुरुवात केली. पुरुष शिकार व मासेमारी करण्यासाठी बाहेर असताना स्त्रिया फळे व कंदमुळे गोळा करत व त्यांच्या बियांची लागवड करून फळझाडे तयार करू लागल्या व यातूनच शेतीचा विकास सुरू झाला. कोंबड्या, मेंढ्या, गाढव, घोडे, बैल, गाय, डुक्कर हे प्राणी मानव पाळू लागला व त्याच्या भटकत्या जीवनात परिवर्तन होऊन स्थिरता येऊ लागली व त्याबरोबरच वसाहतींचा विकास होऊ लागला.

इ.स. पूर्व 9000 ते 4000 वर्षादरम्यान मानवाने विविध साधनांचा वापर करून वसाहती स्थापन केल्याचे पुरावे सापडले आहेत. मातीच्या झोपड्या, पाळीव जनावरांचे गोठे,

जमिनीत गाडलेल्या धान्य साठविण्याच्या टोपल्या उत्खननात सापडल्या आहेत. या काळात साधारणतः 50 ते 60 कुटुंबांच्या वसाहती आढळतात. इ.स. पूर्व 4000 पर्यंत वसाहतींना

नियोजनबद्ध व प्रशासकीय स्वरूप प्राप्त होऊ लागले होते. याच काळात तैग्रीस-युफ्राटिस नद्यांच्या खोऱ्यात मेसोपोटेमिया संस्कृतीचा विकास झाला. अनेक जुन्या वसाहतींचे रूपांतर पुढे प्रसिद्ध नगरांमध्ये झालेले दिसते. एरीच, उर, लागाश, जामेत, इश इ. शहरे विकसित झाली. नाईल नदीच्या खोऱ्यातही इ. पूर्व 3500 पर्यंतच्या वसाहतींच्या अस्तित्वाच्या खुणा आढळल्या आहेत. सर्वांत प्राचीन इ.स. पूर्व 3100 मध्ये उदयास आलेले मेम्फिस शहर येथे अनेक वर्षे अस्तित्वात होते. महाराष्ट्रातील अहमदनगर, जिल्ह्यात प्रवरा नदीच्या काठावर संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथे सन 1950 -51 मध्ये डॉ. एच. डी. सांकलिया व डॉ. एस. बी.देव यांनी 3000 वर्षांपूर्वीच्या जोर्वे संस्कृतीच्या खुणा उत्खननातून मिळविल्या. त्याचबरोबर प्रवरेच्या काठावरच श्रीरामपूर तालुक्यात दायमाबाद (सध्याचे पटेगाव) येथे 1958-59 मध्ये एम.एम. देशपांडे व सन 1974 ते 1979 दरम्यान डॉ. शंकरराव साळी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या उत्खननात इ.स. पूर्व 3900 वर्षांपूर्वीपासून वेगवेगळ्या कालावधीत विकसित झालेल्या वसाहतींचे अवशेष आढळले आहेत,

पॅलिओलिथिक काळातील भटके व विखुरित जीवन जगणारा माणूस निओलियिक काळापर्यंत हळूहळू बदलत गेला व वसाहतींना नवीन रूप प्राप्त होत गेले. छोट्या झोपड्यांच्या पुंजक्यांपासून खेड्यांमध्ये व खेड्यांचे नगरांमध्ये रूपांतर होऊ लागले. थोडक्यात, नागरीकरण ही संकल्पना निर्माण होऊ लागली. कोणत्याही मानवी वसाहती प्राथमिक अवस्थेत अत्यंत छोट्या किंवा वाडी स्वरूपात असतात. नंतर त्यांचे रूपांतर खेड्यात होते, खेड्याचे रूपांतर शहरात, शहराचे नगरात व नगराचे महानगरात रूपांतर होते. या शहर ते महानगर या वसाहती नागरी वसाहती समजल्या जातात. प्राथमिक वसाहतीच्या निर्मितीपासून त्यांचा नागरी वसाहतीत झालेल्या परिवर्तनापर्यंत वेगवेगळ्या घटकांचा पडणारा प्रभाव महत्त्वाचा असतो. सहज उपलब्ध होणाऱ्या पाणी- पुरवठ्याच्या सोई, सुपीक व उपजावू भूमी, एखादी महत्त्वाची नैसर्गिक साधनसंपत्ती, परिसरातच उपलब्ध होणारे बांधकाम साहित्य, वाहतुकीच्या सुविधा, नैसर्गिक आपत्ती व शत्रूपासून संरक्षण या गोष्टी जेथे आदर्श असतात तेथे वसाहतींची स्थापना होऊन तिचा विकास जलद गतीने होतो.

## <u>ग्रामीण वसाहतींचे प्रकार</u>

## (Types of Rural Settlement)

वसाहती स्थापन होताना त्यांच्यावर भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक घटकांचा प्रभाव असतो. वस्त्यांचे केंद्रीकरण व विकेंद्रीकरण, वस्त्यांमधील अंतर यावरही हे घटक प्रभाव पाडतात. वस्त्यांमधील घरातील अंतरानुसार ग्रामीण वसाहतींचे प्रकार अभ्यासले जातात ते पुढीलप्रमाणे -


## 1.विखुरित/एकाकी ग्रामीण वसाहती

विखुरित वसाहती प्रकारामध्ये घरे एकमेकांपासून दूर अंतरावर वसलेली असतात. वनक्षेत्र, डोंगराळ प्रदेश, तलाव, तळे, दलदलीचे प्रदेश या भौगोलिक कारणांमुळे किंवा कृषी व्यवसायाच्या निमित्ताने शेतांमध्ये दूरदूर अंतरावर वसाहती स्थापन झालेल्या असतात. त्यांना विखुरित किंवा एकाकी वसाहती असे म्हणतात. विखुरित किंवा एकाकी वसाहतींची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

“भौगोलिक अडथळ्यांमुळे किंवा शेतीच्या उद्देशाने ज्या वसाहतीमधील घरे दूर- दूर अंतरावर विखुरलेली असतात. त्या वसाहतींना विखुरित, एकाकी किंवा प्रकीर्ण वसाहती असे म्हणतात.”

जेथे भूरचना ओबडधोबड किंवा डोंगराळ स्वरूपाची असते. अशा ठिकाणी वरील वस्त्या निर्माण होतात. तसेच अशा प्रकारच्या वस्त्या गवताळ मैदानात पशुपालन करणारे, अरण्यात लाकूड कटाई करणारे किंवा शिकारीला योग्य अशा प्रदेशातील शिकारी लोकांमुळे निर्माण होतात.

शेतीव्यवसायामुळेही वस्त्यांचे विकेंद्रीकरण होते. कृषी उत्पादन वाढविण्यासाठी शेतकरी आपल्या कुटुंबासह भरपूर वेळ कृषी कार्य करता यावे म्हणून शेतात वसाहती करतात. ब्लाश या प्रसिद्ध भूगोलतज्ज्ञाच्या मते, विखुरित ग्रामीण वस्त्या भूपृष्ठाचा उतार, मातीचे प्रकार, पाणीपुरवठ्याची साधने आणि शेतीयोग्य जमिनीचे विभक्तीकरण यामुळे निर्माण होतात.



आकृती क्र. 3.1 : विखुरित वसाहती

**वितरण**

जागतिक स्तरावर कझाकिस्तान, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, रशियातील स्टेप्स, संयुक्त संस्थानातील प्रेअरी, दक्षिण आफ्रिकेतील व्हेल्डस्, ऑस्ट्रेलियातील डाऊन्स या गवताळ प्रदेशांमध्ये विखुरित वसाहती आढळतात. कॅनडा व सैबेरियातील सूचिपर्णी वृक्षांच्या प्रदेशात तेथील खनिजसंपत्ती व फर मिळविण्यासाठी, मेक्सिको व बोलव्हियात मोठ्या आकाराच्या शेतमळ्यात विखुरित वसाहती आहेत.

उत्तर भारतात हिमालयाच्या उंच-सखल प्रदेशात काश्मीरपासून नेपाळपर्यंत विखुरित वसाहती आढळतात. तसेच दक्षिण व पश्चिम भारतात सह्याद्रीच्या पठारावर, पश्चिम बंगालमध्ये नद्या व

तलावांच्या काठावर, आसामच्या घनदाट जंगलातील शिकारी क्षेत्रात, गंगा व यमुनेच्या दुआबात शेतीव्यवसायामुळे अशा अनेक विखुरित वस्त्या निर्माण झाल्या आहेत.

**विखुरित वस्त्यांचे फायदे/तोटे फायदे/गुण**

1.कृषिक्षेत्रात मुख्यतः या वसाहती आढळतात. शेतकऱ्यांची घरे शेतातच असल्यामुळे शेतीस भरपूर वेळ मिळतो.

2.शेतीव्यवसायाबरोबरच शेतकरी पशुपक्षी पालनाचा व्यवसायही करू शकतात.

3.शेती उत्पादनात वाढ होते.

4.श्रमशक्तीचा पुरेपूर वापर केला जातो.

5.वसाहती दूरदूर अंतरावर असल्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने या वसाहती उपयोगी आहेत.

6.वसाहतीमधील घरे दूरदूर अंतरावर असल्यामुळे गावातील कलह, भांडणे, राजकारण या गोष्टींपासून या वसाहती मुक्त असतात.

**तोटे/दोष**

1.विखुरित वसाहतींमध्ये संरक्षणाचा प्रश्न निर्माण होतो.

2.वैद्यकीय व इतर सुविधा पुरविण्यात अडचणी येतात.

3.विखुरित वसाहतींमधील लोकांचा सामाजिक संपर्क कमी होतो. त्यामुळे सांधिकता व एकोपा कमी होतो.

4.सामुदायिक जीवन जगता येत नाही. त्यामुळे एकाकीपणातून नैराश्य येण्याची शक्यता जास्त असते.


## 2.केंद्रित/सधन ग्रामीण वसाहती

## (Concentrated/Compact Rural Settlement)

विशिष्ट ठिकाणी एकवटलेल्या घरांना किंवा वस्तीलाच केंद्रित किंवा सधन वसाहती असे म्हणतात. या वस्ती प्रकारात घरे परस्परांच्या एकदम जवळ किंवा दाटीवाटीने उभारलेली असतात. अशा वसाहती सामान्यतः सर्वच सुविधांनी सज्ज असतात. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. कळप करून राहण्याचा जो मानवी समाजाचा पूर्वापारपासूनचा गुण आहे. त्यामुळेच अशा स्वरूपाच्या केंद्रित किंवा सधन वसाहती ग्रामीण भागात तयार झाल्या आहेत. सधन किंवा केंद्रित वस्त्यांची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल."

"विशिष्ट ठिकाणी भौगोलिक परिस्थिती अनुकूल असलेल्या व सर्व सुविधांनी युक्त अशा दाटीवाटीने किंवा जवळजवळ अंतरावर उभारलेल्या घरांच्या समुदायाला किंवा वसाहतींना केंद्रित किंवा सधन वसाहती असे म्हणतात."

कृषी संपन्न सुपीक मैदानी प्रदेशात अशा दाट केंद्रित वसाहती आढळतात. दहा हजार वर्षांपूर्वी मानवाने शेती करण्यास व प्राण्यांना पाळण्यास सुरुवात केली. तेव्हापासून या कायम स्वरूपाच्या स्थिर वसाहती निर्माण झाल्या. मानव एकटा नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाण्यास असमर्थ होता. अरण्यतोड करणे, जमीन जाळून साफ करणे, या सर्व गोष्टींसाठी त्याला एकमेकांशी सहकार्य करणे आवश्यक होते. अशा सहकार्यातूनच केंद्रीय वस्त्यांची निर्मिती झाली. वरील कारणांमुळेच शेतीबरोबरच मासेमारी व शिकार हे प्रमुख उद्योग असलेल्या प्रदेशातही केंद्रित वस्त्या तयार झाल्या.



आकृती क्र. 3.2 : केंद्रित सधन वसाहती

**वितरण**

गंगा-सिंधू, हो-हँग हो, नाईल नद्यांचे मैदानी प्रदेश, उत्तर भारत, पूर्व चीन, इजिप्त, सीरिया, बांगलादेश, पाकिस्तान, म्यानमार, जावा, थायलंड, श्रीलंका, मेक्सिको, इजिप्त, केनिया, ब्राझील, तसेच उत्तर पश्चिम युरोपमध्ये केंद्रित वसाहती आढळतात. को, नेपाळ, सोव्हकोझ व कोलकोझ (Farms), चीनमधील कम्युन्स (Communes), इनरशियातील किंबुत्स (kibutz) या सरकार नियंत्रित एकत्रित शेतीच्या पद्धतीमुळे केंद्रित वसाहती तयार माल्या आहेत. भारतात नर्मदा नदीचे खोरे, बिहार, उत्तर प्रदेशातील विंध्य पठार, दक्षिण भारतात गोदावरी कावेरीच्या मैदानी प्रदेशात केंद्रित वसाहती आढळतात.

**केंद्रित किंवा सधन वस्त्यांचे फायदे/तोटे**

1.केंद्रित वसाहतींमध्ये दुकाने, बाजारपेठा, शाळा, वैद्यकीय सुविधा, धार्मिक स्थळे, करमणुकीच्या सुविधा, वाहतूक या सर्व सुविधा उपलब्ध होतात.

2.संरक्षणाच्या दृष्टीने या वसाहती सुरक्षित असतात.

3.केंद्रित वसाहतींमुळे सामाजिक सहकार्यात वाढ होते. एकमेकांच्या सहकार्यामुळे विकास होतो.

**तोटे/दोष**

1.केंद्रित वसाहतींमध्ये घरे अत्यंत जवळ असल्यामुळे वाहतूक, पाणीपुरवठा, मलनिस्सारण इ. सुविधांच्या पुरवठ्यात व प्रशासनात अडचणी येतात.

2.आरोग्याचा व प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होतो.

3.वसाहतींच्या गर्दीमध्ये भांडण, तंटे, हेवेदावे यांची भर पडून सामाजिक स्वास्थ्य बिघडते.

**3.संमिश्र/संयुक्त ग्रामीण वसाहती (Composite Rural Settlement) :**

संमिश्र ग्रामीण वसाहत प्रकारात एक मुख्य (केंद्रित) ग्रामीण वसाहत असते व तिच्या सभोवताली घरांचे लहान-लहान समूह (Hamlets) असतात. अशा प्रकारे एक मुख्य खेडे व काही अंतरावर झोपड्यांचा समूह मिळून एकच वस्ती तयार होते. मुख्य वस्तीच्या नावानेच आजूबाजूच्या लहान वसाहतींचा उल्लेख केला जातो. अशा वस्त्यांना डॉ. कौशिक यांनी संमिश्र वस्ती असे नाव दिले आहे. संमिश्र ग्रामीण वसाहतीची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

"एक मुख्य गावाची वसाहत व त्या गावाभोवताली घरांचे लहान-लहान समूह (Hamlets) अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना असलेल्या वसाहतींना संमिश्र वसाहत असे म्हणतात."

घरांचे लहान-लहान समूह (Hamlets) सामाजिक, सांस्कृतिक व प्रशासकीयदृष्ट्या मूळ वस्तीशी संलग्न असतात. डॉ. आर.एल. सिंग यांनी अशा वसाहतींना अर्ध-सधन वस्त्या असे म्हटले आहे.

**वितरण**

गंगा नदीच्या मैदानात अशा प्रकारच्या हजारो वस्त्या असून त्या तीन ते चार झोपड्यांचे समूह एकत्र येऊन निर्माण झाल्या आहेत. मिरत जिल्ह्यात शामपूर, असोडा, भवन-बहादूर, हरसिंहपूर, बदनोली, गिरधरपूर आणि रघुनाथपूर येथे अशा स्वरूपाच्या वसाहती आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातही अशा प्रकारच्या वसाहती सर्वदूर आढळतात. सांगली जिल्ह्यातील नागाव-कवठे, तूर्ची-ढवळे, टाकळी-बोलवाड, अहमदनगर जिल्ह्यातील बेलापूर-ऐनतपूर वसाहतींची उदाहरणे आहेत.

## ग्रामीण वसाहतींचे प्रारूप किंवा आकृतिबंध

## (Patterns of Rural Settlement)

ग्रामीण वसाहती मग त्या केंद्रित असोत किंवा विखुरलेल्या त्यांना एक विशिष्ट प्रकारचा आकार प्राप्त झालेला असतो. हा आकार त्यांना वस्तीचे ठिकाण, सभोवतालची भूरचना, पृष्ठभागाचे स्वरूप याला अनुसरून प्राप्त झालेला असतो. या वस्त्यांनी धारण केलेल्या आकारालाच वस्त्यांचा आकृतिबंध (Pattern) किंवा प्रारूप असे म्हणतात. ग्रामीण वसाहतींच्या आकृतिबंधाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.


"वसाहतींचा आकृतिबंध म्हणजे दोन वस्त्यांचे स्थळाच्या संदर्भात व्यक्त केलेले व एकमेकांपासून वेगळे असलेले आकाररूप होय."

शतकानुशतके पर्यावरणाशी साधल्या जाणाऱ्या संबंधातून ग्रामीण वस्त्यांचा आकृतिबंध तयार झालेला असतो. ग्रामीण वसाहतींच्या आकारावर किंवा आकृतिबंधावर भौगोलिक घटकांबरोबरच जातीपातीचे स्वरूप, वसाहतीचे कार्य, सामाजिक व धार्मिक घटकही परिणाम करतात. नद्यांचे काठ, कालवे, समुद्रकिनारे, रस्तेमार्ग, रेल्वे इत्यादी. जवळ वसाहती रेषाकार धारण करतात तर सुपीक सखल मैदानी प्रदेशात त्या चौरसाकृती असतात. तलाव व सरोवराच्या सभोवताली त्या वर्तुळाकार व अर्धवर्तुळाकार असतात. जेथे रस्ते एकमेकांना येऊन मिळतात. तेथे वसाहती चौकोनी, त्रिकोणी, वर्तुळाकार धारण करतात. जगाच्या विविध भागात वस्त्यांचे पुढील आकार आढळतात.

### 1.रेषाकृती वस्त्या (Linear Pattern):

सरळ लांब रेषेत वसलेल्या वसाहतींचा हा आकृतिबंध जगात बहुतेक ठिकाणी आढळतो. नदी, कालवे, रस्ते, लोहमार्ग यांच्या दोन्ही बाजूने तसेच पर्वतीय प्रदेशात डोंगरउतारावरील बाजूस, सरळ रेषेतील तसेच सागरकिनाऱ्यालगत लाटांच्या टप्प्याबाहेर या वसाहती एका सरळ रेषेत वसलेल्या आढळतात. रेषाकृती वस्त्यांची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

"नदी, कालवे, रस्ता किंवा रेल्वेमार्ग यांच्या दुतर्फा आणि पर्वतीय भागात पर्वताच्या पायथ्याशी तसेच सरळ रेषेतील सागरकिनाऱ्यालगत अरुंद परंतु लांब पट्ट्याच्या आकाराच्या वसाहती तयार होतात. त्यांना रेषाकृती वस्त्या असे म्हणतात."




आकृती क्र. 3.5 : रेषाकृती वस्त्या

अशा वसाहती अमेरिकेतील सेंट लॉरेन्स कालव्याच्या दोन्ही बाजूस उत्तर प्रदेशात गंगेच्या मैदानी प्रदेशातील प्रत्येक जिल्ह्यात रस्त्यांच्या कडेला, महाराष्ट्रातील अनेक रस्त्यांच्या कडेला तसेच केरळमध्ये कायलच्या दोन्ही बाजूस, कोकणातील सरळ किनाऱ्याला समांतर या वसाहती स्थापन झालेल्या आहेत. मध्य हिमालय, आल्प्स, रॉकी, अँडिज, पामीर, हिंदुकुश शिवालिक या पर्वतीय भागातही रेषाकृती वस्त्या आढळतात

## 2.आयताकृती वस्त्या (Rectangular Pattern) :

जागतिक साठ टक्के लोक ग्रामीण वस्त्यांत राहतात. यातील बहुतांश वसाहतींचा आकार आयताकृती आहे. नद्यांच्या सुपीक मैदानी प्रदेशात, रुंद पर्वतरांगांत, नद्यांच्या खोऱ्यात बहुसंख्य वस्त्या या आकाराच्या असतात,

“सुपीक मैदानी आयताकृती शेतीक्षेत्र रुंद पर्वतरांगा नद्यांच्या खोऱ्यात, रस्ते एकमेकांना मिळतात तेथे रुंद व लांब पट्ट्याच्या आकाराच्या वसाहती तयार होतात त्यांना आयताकृती वस्त्या असे म्हणतात.”




आकृती क्र. 3.6 : आयताकृती वसाहती

महाराष्ट्रात आयताकृती वसाहती मोठ्या प्रमाणात आढळतात. कोल्हापूर, सांगली, सातारा येथे या वसाहती आढळतात. केंद्रस्थानी मोठा. पाणवठा, मंदिर, चर्च, मस्जिद यांच्या सभोवताली आयताकृती वसाहती निर्माण होतात. मोठे मैदान, बाजाराची जागा, शाळा, पंचायत, चावडी, मठ अशा सार्वजनिक उपयोगाच्या जागेच्या भोवताली आयताकृती वसाहती निर्माण होतात.

### 3.चौरसाकृती वस्त्या (Square Pattern) :

चौरसाकृती वस्त्या या प्रामुख्याने सलग सपाट मैदानी प्रदेशात मोठ्या प्रमाणावर आढळतात. नदीच्या खोऱ्यात, रस्ते एकमेकांस मिळतात तेथे निर्माण होणाऱ्या वस्त्यांचा आकार चौरसाकृती तयार होतो.

“ज्या ठिकाणी दोन रस्ते एकमेकांस छेदतात तेथे रस्त्याच्या चारही बाजूला वस्ती विकसित होते त्यास चौरसाकृती वस्ती असे म्हणतात.”




आकृती क्र. 3.7 : चौरसाकृती वस्त्या

चौरसाकृती वस्त्या जर्मनी, रशिया, सेंट्रल आशियन रिपब्लिक, चीन, उत्तर व दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, मलेशिया, इस्त्रायल आणि फ्रान्समधील नियोजित वस्त्यांचा आकार प्रामुख्याने चौरसाकृती आहे. भारतातील अनेक नियोजित वसाहती तसेच पुनर्वसन केलेल्या वसाहतीचा आकार चौरसाकृती आहे.

### 4.त्रिकोणाकृती वस्त्या (Triangular Pattern) :

मुख्यतः दोन नद्यांच्या संगमावर त्रिकोणाकृती वसाहती विकसित होतात. दोन्ही नद्यांच्या तीरांवर वस्त्या निर्माण होतात आणि हळूहळू वाढत जातात. मात्र नदी ज्या दिशेने येते तेथे वस्त्यांना मर्यादा पडते. यामुळे या वस्त्यांचा आकार त्रिकोणासारखा दिसतो.

काही नैसर्गिक किंवा सांस्कृतिक भूदृश्यांमुळे वसाहतींच्या विकासाला मर्यादा येतात व वस्त्यांना त्रिकोणाकृती आकार प्राप्त होतो अशा वस्त्यांना त्रिकोणाकृती वस्त्या असे म्हणतात.”




आकृती क्र. 3.8 : त्रिकोणाकृती वस्त्या

भारतातील अनेक नद्यांच्या संगमावर धार्मिक स्थळांचा विकास झाला आहे. अशा धार्मिक स्थळांच्या ठिकाणी नद्यांच्या संगमावर त्रिकोणाकृती आकाराच्या वस्त्यांची निर्मिती झालेली दिसते. पुण्यातील संगमवाडीचा आकारही असाच त्रिकोणाकृती आहे.

## 5.वर्तुळाकार वस्त्या (Circular Pattern):

पाणवठ्याची साधने त्यात विहिरी, तलाव, सरोवरे, चंद्राकृती सरोवरे यांच्या सभोवतालच्या वसाहतींना आपोआपच गोलाकार आकार प्राप्त होतो. तसेच एखादी महत्त्वाची वास्तू असेल तर त्या भोवतीही वसाहती गोल स्वरूपात विकसित होतात.

“तलाव, सरोवरे, समुद्रकिनाऱ्यावरील खाऱ्या पाण्याची सरोवरे, ज्वालामुखी- निर्मित सरोवरे, महत्त्वाची वास्तू यांच्याभोवताली वर्तुळाकार स्वरूपात घरे बांधलेली असतात अशा वस्त्यांना वर्तुळाकार किंवा गोलाकार वसाहती असे म्हणतात.”




आकृती क्र. 3.9 : वर्तुळाकार वस्त्या

आफ्रिकेतील पशुपालक 'मसाई' जमातीच्या लोकांची वसाहत अशा वर्तुळाकार स्वरूपाची असते. अशा गोलाकार वसाहतीला क्रॉल (Crawl) असे म्हणतात. मसाई लोक आपल्या पशुंचे संरक्षण व्हावे म्हणून मध्यवर्ती मोकळ्या जागेत पशुंना ठेवतात व सभोवताली गोलाकार घरे बांधतात. पाणवठ्यांच्या कडेला राहणाऱ्या लोकांचे उद्योग पाण्यावर अवलंबून असतात. मासेमारी करणे, शेवाळ गोळा करणे, प्रवासी वाहतूक करणे, पर्यटकांना जलसफारी घडवून आणणे असे त्यांचे उद्योग असतात.

### 6.तारकाकृती वस्त्या (Star Pattern) :

वेगवेगळ्या दिशेने येणारे रस्ते जेथे एकत्र येतात तेथे केंद्रस्थानी व रस्त्यांच्या बाजूने घरे वाढत जातात व तारकाकृती वस्त्यांची निर्मिती होते. या रस्त्यावर दोन्ही बाजूस सर्व दिशांनी घरे, दुकाने, हॉटेल्स, दवाखाने उभे राहत जातात व तारकाकृती आकार प्राप्त होतो.



आकृती क्र. 3 : 10 : तारकाकृती वस्त्या


“कायमस्वरूपी, रस्ते जेथे एकमेकांस मिळतात तेथे घरांची संख्या वाढते त्याचबरोबर रस्त्यांच्या दोनही बाजूने घरे, दुकाने, हॉटेल्स इ. वाढत जाऊन वसाहतीस तारकाकृती आकार प्राप्त होतो त्यास ‘तारकाकृती वसाहत’ असे म्हणतात.”

या प्रकारच्या वस्त्या नैऋत्य युरोपच्या ग्रामीण भागात, यांगत्सेच्या सखल मैदानात, पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात आणि सतलज-गंगेच्या मैदानी प्रदेशात विकसित झाल्या आहेत.

## 7.द्विकेंद्रित वस्त्या (Bouble Nucleated Pattern) :

एखाद्या वसाहतीचे नैसर्गिक घटकातील नदी, तलाव, सरोवर, पर्वत, पठार इ. मुळे तर सांस्कृतिक घटकातील रस्ता, लोहमार्ग, कालवे इत्यादी घटकांमुळे वसाहतींचे विभक्तीकरण होते.

“एकाच वस्तीचे काही नैसर्गिक किंवा सांस्कृतिक घटकांमुळे विभाजन झाल्यास त्यांना द्विकेंद्रित वस्त्या असे म्हणतात.”





आकृती क्र. 3:11 : द्विकेंद्रित वस्त्या

महाराष्ट्रामध्ये नदीच्या किंवा तलावाच्या, खाडीच्या, डोंगराच्या अलीकडे व पलीकडे रस्त्याच्या किंवा रेल्वेमार्गांच्या दोन्ही बाजूस अशा अनेक द्‌विकेंद्रित वस्त्या निर्माण झाल्या आहेत. अशा वसाहतींमध्ये मूळ वस्तीला 'बुद्रुक' तर दुय्यम वस्तीला 'खुर्द' असे म्हणतात.

## 8.नियोजित ग्रामीण वस्त्या (Planned Pattern):

ग्रामीण भागातील अनेक वस्त्यांच्या आकारावर भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक घटकांचा परिणाम झालेला असतो; परंतु अलीकडे एक-दोन दशकात वसाहतीच्या आकृतिबंधात बदल दिसून येतो. अनेक नव्या वस्त्या शासकीय किंवा सार्वजनिक पातळीवर नियोजनबद्‌ध विकसित केलेल्या दिसतात, त्यांना नियोजित वसाहती असे म्हणतात.

"ज्या वस्त्यांचा आकार आणि स्वरूप पूर्वनियोजित, निश्चित आणि विचारपूर्वक ठरविलेले असतात अशा वस्त्यांना नियोजित वसाहती असे म्हणतात."



आकृती क्र. 3 : 12 : नियोजित वसाहत


अशा अनेक नियोजनबद्ध वसाहती नवीन देशांच्या ग्रामीण भागात उभारलेल्या दिसतात. ऑस्ट्रेलिया, इस्रायल, दक्षिण आफ्रिका, रशिया, मध्य आशिया, जर्मनी, स्वीडन या देशांत अशा वसाहती आढळतात. भारतात राजस्थानमधील सूरजगड हे नियोजित ग्रामीण वसाहतीचे उत्तम उदाहरण आहे.

## 9.आकारहीन वस्त्या (Shapeless Pattern)

वसाहतीचा विकास होताना विविध भौगोलिक किंवा सांस्कृतिक घटकांचा प्रभाव पडत असेल तर वसाहतीला कोणताही आकार प्राप्त होत नाही. अशा वस्त्या आकारहीन असतात.

“विविध घटकांच्या प्रभावामुळे वसाहतीला निश्चित असा कोणताही आकार प्राप्त होत नाही, अशा वसाहतींना आकारहीन वस्त्या असे म्हणतात.”


अशा वसाहती मुख्यतः स्थलांतरिता- 'मुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होतात. बांधकाम, रस्तेबांधणी, धरणबांधणी या कामावरील कामगार लोक जेथे जागा मिळेल तेथे वस्ती करतात. काम संपले तरी ती वस्ती कायम तशीच राहते अशी वस्ती आकारहीन स्वरूपाची असते.



आकृती क्र. 3 : 13 आकारहीन वसाहत

### 10.इंग्रजी V अक्षराच्या आकाराच्या वस्त्या

जगभर ग्रामीण भागात विविध आकाराच्या वसाहती आहेत. जर वसाहतनिर्मितीत प्राकृतिक किंवा सांस्कृतिक घटकापैकी एखाद्या घटकाने जरी मर्यादा घातली तर वस्तीच्या विकासाला मर्यादा येतात व वस्तीला विशिष्ट इंग्रजीतील V, Y, S, T, L असा आकार प्राप्त होतो. त्यांना इंग्रजी आकाराच्या वस्त्या असे म्हणतात. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अशा वसाहती आढळतात.




आकृती क्र. 3.14 : इंग्रजी अक्षराच्या आकाराच्या वस्त्या

## भारतातील नागरीकरण

## (Urbanisation In India)

**नागरीकरण संकल्पना**

नागरीकरण ही एक प्रक्रिया आहे. प्रदेश नागरी होण्याची प्रक्रिया म्हणजे नागरीकरण होय. गावाचा विकास होऊन नगर किंवा शहराचे रूप धारण करण्याच्या प्रक्रियेला 'नागरीकरण' (Urbanisation) असे म्हणतात. या प्रक्रियेत एखाद्या प्रदेशातील किंवा देशातील अधिकाधिक लोक नागरी भागात राहू लागतात. नागरीकरण हा मराठी शब्द, इंग्रजी भाषेतील (Urban) या शब्दाचे मराठी रूपांतरण आहे. इंग्रजी (Urban) हा शब्द लॅटिन भाषेतील 'Urbs' या शब्दापासून आलेला आहे. लॅटिन भाषेत 'Urbs' या शब्दाचा अर्थ नगर किंवा शहर असा होतो. या नगरांचा किंवा शहरांचा सतत विकास होत असतो

नागरीकरणाची ही प्रक्रिया सतत सुरू असते. नागरीकरण हे औद्योगिकीकरणाचे अपत्य आहे असे म्हटले जात असले तरी नागरीकरणाची ही प्रक्रिया प्राचीन काळापासून सुरू आहे. नागरीकरणाच्या प्रक्रियेत नागरी लोकसंख्येची वाढ, खेड्यांमधून नगरांकडे स्थलांतर, त्यांच्या व्यवसायात झालेला बदल, जीवन पद्धतीतील बदल या सर्व गोष्टी अभिप्रेत आहेत, पुढील काही व्याख्यांवरून नागरीकरण या संकल्पनेची आपल्याला स्पष्ट कल्पना येईल-

"नागरीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्या प्रक्रियेत ग्रामीण वसाहतीचे नागरी वसाहतींमध्ये रूपांतर होत असते."

"ज्या ठिकाणी उद्योगशीलता अधिक प्रमाणात आढळते आणि संपूर्ण जीवन पद्धती नवीन तयार होते त्यास नागरीकरण असे म्हणतात.

"नागरीकरण प्रक्रियेत सभोवतालच्या ग्रामीण भागातून नागरी भागाकडे सतत स्थलांतरित होणाऱ्या असंख्य लोकांच्या समूहाला नागरीकरण असे म्हणतात.

"नागरीकरण हे ग्रामीण वसाहतीचे स्थलांतर आहे, व्यवसायाचे तसेच उत्पादनांचे स्थलांतर आहे." वरील व्याख्यांच्या अभ्यासावरून सारांशरूपाने हेच म्हणता येईल की, नागरीकरण म्हणजे ग्रामीण वसाहतींचे नागरी वसाहतीत रूपांतर होण्याची प्रक्रिया होय. नागरीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर

त्या खेड्याचे किंवा वसाहतीचे रूपांतर पूर्ण नगरात केव्हा होते किंवा त्या खेड्याला किंवा वसाहतीला नगर केव्हा म्हटले जाते हे ही माहीत असणे गरजेचे आहे. जगात किंवा वेगवेगळ्या देशात नगराची व्याख्या वेगवेगळ्या स्वरूपात केली जाते. संयुक्त संस्थानात 2500 पेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या वसाहतीला नगर असे म्हणतात. तर फ्रान्समध्ये 2000 पेक्षा जास्त लोकवस्ती, जपानमध्ये 30,000 पेक्षा जास्त लोकवसाहत असलेल्या वस्तीला नगर म्हटले जाते. भारतात 5000 पेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या लोकवसाहतीला नगर असे म्हणतात.

सर्वप्रथम नगर केव्हा निर्माण झाले हा जरी आपल्यासमोरील प्रश्न असला तरी ए.व्ही. गॅलियन या तत्त्ववेत्याच्या मते प्रारंभिक काळात मानव दोन अवस्थांमधून जात होता. त्यातील पहिल्या अवस्थेत अश्म किंवा पाषाण युगापूर्वी (Paleolithic age) मानव गुहा सोडून बाहेरील खुल्या क्षेत्रात आला. झाडाच्या फांद्या व पाने वापरून झोपड्या बांधून राहू लागला. हे त्याचे नागरीकरणाच्या संदर्भात टाकलेले पहिले पाऊल समजण्यात येते. ऐतिहासिक अभ्यासातून ख्रिस्तपूर्व 5000 ते 6000 वर्षांपूर्वी नगरे अस्तित्वात आली

## भारतातील नागरीकरण (Urbanization in India)

भारतात प्राचीन काळापासून नागरी केंद्रे व नागरीकरणाचा विकास झाल्याची उदाहरणे आहेत. इ.स. पूर्व 3000 मध्ये विकसित झालेली मोहेंजोदडो आणि हडप्पा ही त्याची उदाहरणे आहेत. भारतात प्राचीन व मध्ययुगीन काळात अनेक नगरे आणि शहरे विकसित आली, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, भूराजकीय आणि सांस्कृतिक कारणांसाठी काही नरे प्रसिद्ध होती. काशी, कांची, नालंदा तक्षशिला ही चार विद्यापीठे व त्यांच्या सभोवताली विकसित झालेली नगरे, शैक्षणिक कार्यासाठी जगप्रसिद्ध होती. मध्य भारतातील पैठा शहरही शैक्षणिक व धार्मिक दृष्टीने महत्त्वाचे होते. धार्मिक उद्देशानेही काही नगरे विकसित झाली होती. इ.स. 647 मध्ये महाराजा हर्षवर्धनाच्या साम्राज्याच्या समाप्तीनंतर बराच काळ नागरीकरणाला अडथळे आले. त्यानंतर मात्र 1192 च्या दरम्यान मुगल साम्राज्याचा प्रारंभ झाला व शहरे आणि नगरांच्या विकासाला चालना मिळाली. अकबर शेरशाहाच्या काळात अनेक नगरे विकसित झाली. मुघलांनी आगरा, फतेहपूर सीक्री, लाहौर, शाहजहानाबाद किंवा दिल्ली, दक्षिणेकडे हैद्राबाद, विजापूर ही शहरे विकसित केली.

भारतात युरोपियनांच्या वसाहती येण्याअगोदर नागरीकरणाची प्रक्रिया फारच मंद होती. युरोपियनांच्या आगमनाबरोबरच नागरीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. व्यापाराच्या उद्देशाने भारतात

आलेल्या युरोपियनांनी अनेक शहरे विकसित केली. ब्रिटिश, डच, फ्रेंच यांनी व्यापारी उद्देशाने सागर किनाऱ्यालगत महत्त्वाच्या बंदरात आपल्या वखारी उघडल्या. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या उद्देशाने मुंबई, मद्रास, कलकत्ता ही बंदरे विकसित केली. त्यातून नगरांचाही विकास होऊ लागला. ब्रिटिशांनी देशाच्या राजकारणासाठी सामरिक ठिकाणी कॅन्टोन्मेन्ट्स किंवा सैनिकी छावण्या स्थापन केल्या. यातूनच आग्रा, झाशी, मीरत, महू, जालंधर, दिल्ली, पुणे, मसुरी, सिमला, अहमदाबाद, अंबाला, रूरकी अशा नगरांचा विकास झाला. ब्रिटिशांच्या राजवटीत शासकीय कामांमुळे राजधान्यांची शहरे व जिल्ह्याची ठिकाणे विकसित झाली. परंतु हा नगरांचा विकास फारच मर्यादित होता.

## भारतीय नागरीकरणाची कारणे किंवा भारतीय नागरीकरणांवर परिणाम करणारे घटक (Causes of Indian Urbanization OR the Factors affecting on Indian Urbanization)

### 1.लोकसंख्येतील नैसर्गिक वाढ (Natural Increase in Population):

लोकसंख्येतील नैसर्गिक वाढीचा उच्च दर म्हणून परिणामी जलद शहरीकरण होत आहे. आरोग्यविषयक चांगल्या वैद्यकीय सुविधांमुळे नागरी भागात मोठ्या प्रमाणात मृत्यूच्या प्रमाणात घट झाली आहे. त्यामानाने जन्मदर मात्र उच्चच राहिला आहे. परिणामी, शहरात लोकसंख्येत नैसर्गिक वाढ होऊन शहरीकरणही वाढत आहे. शुद्ध पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधांची उपलब्धता, साथीच्या रोगांवरील नियंत्रण यामुळे शहरांतील मृत्युदर झपाट्याने घटला आहे. त्यामानाने जन्मदरात मात्र अल्प घट झालेली दिसते. 1971 साली शहरातील जन्मदर दहजारी 30.1 होता. तर मृत्युदर 9.7 होता. त्यात 1991 साली जन्मदर 24.3 पर्यंत श्राखाली घसरला. परंतु मृत्युदर मात्र 7.1 इतका अत्यल्प घसरला. परिणामी, शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढली.

### 2.स्थलांतर (Migration):

ग्रामीण भागाकडून शहराकडे सतत होणारे स्थलांतर हे भारतीय नागरीकरणामागील एक महत्त्वाचे कारण आहे. स्वातंत्र्यानंतर नागरीकरण । झपाट्याने सुरू झाले. नागरी भागातील नोकरीचे आकर्षण, उच्च दर्जाचे राहणीमान, आधुनिक सेवा आणि सुविधा लोकांना आकर्षित करतात. त्यामुळे लोक ग्रामीण भागातून नागरी भागाकडे स्थलांतर करतात. एकूण नागरीकरणात स्थलांतरितांचा वाटा

मोठा आहे. इ.स. 1947 च्या फाळणीनंतर राहणीमान उंचावलेले लोक शहरात स्थायिक होण्याच्या उद्देशाने स्थलांतरित झाले. शहराकडील आकर्षक घटक (Pull Factors) व ग्रामीण भागातील अपसरण घटक (Push Factors) नागरीकरणास प्रोत्साहन देणारेच ठरले. त्यामुळे भारतात नागरीकरण झपाट्याने घडून आले.

**3.औद्योगिक व व्यापारी केंद्रांमध्ये झालेली वाढ (Expansion of Industry and Trade Centers):** स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने नियोजनपूर्वक पंचवार्षिक योजना राबवून औद्योगिक व व्यापारी केंद्रांचा विकास केला. जिल्हा व तालुका स्तरावर औद्योगिक वसाहती स्थापन केल्या. व्यापारी केंद्रांना चालना दिली. त्यामुळे साहजिकच या केंद्राजवळ व उद्योगधंद्यांजवळ नागरी वसाहती एकवटू लागल्या. त्यातून नागरीकरणास चालना मिळाली. ग्रामीण भागातही शेतीवर आधारित उद्योगधंदे विकसित होऊ लागले. या उद्योगधंद्यांभोवताली नागरीकरण सुरू झाले. उदा., पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अनेक साखर कारखाने उभे राहिले व तेथे नागरीकरणास सुरुवात झाली.

**4.शहरांच्या सरहद्दीत झालेला बदल (Changes in the Boundaries of City)** :

शहरांचा विकास जसजसा होत जातो तसतसा तेथील सुविधांवर ताण पडतो. जागेच्या व घरांच्या किमती गगनाला भिडतात. रहदारीच्या समस्या निर्माण होतात. प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होतो अशा वेळेस समस्यांमुळे लोक शहरालगतच वसलेल्या खेडेगावांमध्ये आपल्याला परवडतील अशा जागेत घरे बांधतात किंवा घेतात. कंपन्याही आपले प्लॉट शहराशेजारील खेडेगावाकडे हलवतात. तेथे नागरीकरण सुरू होते. उदा., पुणे शहराशेजारी विकसित झालेले पिंपरी-चिंचवड औद्योगिक केंद्र विकसित होत गेले. त्यातून पिंपरी, चिंचवड शेजारील निगडी, भोसरी, मोशी, हिंजवडी, पिंपळे सौदागर या सर्व खेड्यांचे झपाट्याने नागरी वसाहतीत रूपांतर झाले. शहराच्या सरहद्दी झपाट्याने वाढत गेल्या.

**5.नोकरीच्या संधी (Employment Opportunities) :**

शहरे व नागरी भागात नोकरीच्या खूप साऱ्या संधी असतात. त्यामुळे साहजिकच लोकसंख्या शहरांकडे किंवा नगरांकडे आकृष्ट होते. भारतातील स्व-ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर मान्सून पावसावरील शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे या ग्रामीण भागातील लोकांना वर्षभर शेतीवर आधारित

काम उपलब्ध होत नाही. त्यामुळे जेथे वर्षभर कामधंदा उपलब्ध होईल अशा शहरी भागाकडे ग्रामीण भागाकडून लोक स्थलांतरित होतात तसेच शहरांमध्ये आर्थिक उत्पन्नही जास्त असते. अनेक व्यापारी केंद्रे, कारखाने विविध सेवा व सुविधा केंद्र, शिक्षण, सरकारी कार्यालय नागरी भागात असतात. त्यामुळे तेथे व्यवसाय किंवा नोकरीच्या निमित्ताने लोक जमा होतात व नागरीकरण घडून येते.

### 6.सामाजिक घटक (Social Factors):

भारतीय समाज हा विविध जाती धर्मांमध्ये विभागलेला आहे. या समाजात ग्रामीण भागात कायमचे खटके, दंगे, बखेडे घडून येतात. त्यातूनच असुरक्षिततेची जाणीव निर्माण होते. त्यामुळे ग्रामीण भागातील या असुरक्षिततेला कंटाळून लोक शहरांकडे स्थलांतरित होण्यास प्रवृत्त होतात. त्यातून नागरीकरणास चालना मिळते. ग्रामीण भागातील या धार्मिक व जातीय अस्थिरतेची जाणीव असल्यामुळेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपल्या अनुयायांनी स्वतःची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती साधावयाची असेल तर शहराकडे चला, असा सल्ला दिला जातो. अस्पृश्यता, वाळीत टाकणे, सार्वजनिक बहिष्कार, असहकार अशा सामाजिक घटना स्थलांतरासाठी अपसरण (Push Factors) तर नागरीकरणासाठी (Pull Factors) चे काम करत आहेत.

### 7.आधुनिकतेचे आकर्षण (Attraction of Modernization) :

भारतीय समाज झपाट्याने बदलत आहे. तरुण पिढीला आधुनिक शहरी जीवनाचे आकर्षण आहे. शहरात असलेल्या नोकरी व्यवसायाच्या संधी, शैक्षणिक सुविधा, सरकारी धोरण, द्वितीय व तृतीय सेवांची उपलब्धता, राहणीमान बदलण्याची इच्छा असे अनेक घटक नागरीकरणास प्रेरित करत आहेत. आधुनिक बदलते जग तरुणांना सतत खुणावत आहे. मनोरंजनाची भरपूर साधने शहरात उपलब्ध आहेत. आधुनिक तंत्रज्ञान व त्याच्याशी निगडित असलेले जीवन नगरात उपलब्ध आहे. म्हणून नगरांकडे नागरीकांचा ओघ आहे. परिणामी, भारतात नागरीकरण वाढत आहे.

### 8.सतत पडणारे दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती (Droughts & Natural Hazards) :

थोर अर्थतज्ज्ञ पहिले भारतीय नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. सी.डी. देशमुख यांनी भारतीय शेती म्हणजे मान्सूनवर खेळलेला जुगार आहे असे म्हटले आहे. म्हणजेच भारतीय शेती अनिश्चिततेने भरलेली आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. अजूनही भारतातील ग्रामीण भागात राहणारी 68.2%

लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या शेतीवर अवलंबून आहे. भारतीय शेती मान्सूनवर अवलंबून आहे, जो अनिश्चित आहे. सत पडणारे दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती ही भारतीय शेतीवरील कायमची संख्चत आहे. शेतीमालाला मिळणारा कमी भाव, नापिकी, दुष्काळ, कर्जबाजारीपणा यामुळे सरकारी आकडेवारीनुसार भारतातील 12602 शेतकऱ्यांनी 2015 साली आत्महत्या केल्या. अशा परिस्थितीमुळे भारतीय ग्रामीण भागातून लोक शहराकडे स्थलांतर करतात, त्यातून नागरीकरण वाढते.

### 9.इ.स. 1990 नंतर सुरू झालेले खासगीकरण (Privatisation after 1990) :

जागतिकीकरण व खासगीकरणाचे 1980 च्या दशकात जगभर वारे वाहू लागले. 1990 च्या दशकात भारतातही खासगीकरणाला सुरुवात झाली. सरकारने खासगीकरणाला प्रोत्साहन दिले. त्यातून देशभर उद्योगधंद्यांना पोषक वातावरण निर्माण झाले. आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात प्रवेश केला. अनेक कंपन्या वेगवेगळ्या भागात सुरू झाल्या, त्यांना मजूर पुरवठा व इतर सेवा सुविधांसाठी व्यावसायिक लोक कंपनीच्या आजूबाजूला जमा होऊ लागला. त्यातून नागरीकरणाला चालना मिळाली. उदा., पुणे व जिल्ह्यातील चाकण, तळेगाव, शिक्रापूर, नगर जिल्ह्यातील सुपे, नाशिकमधील सिन्नरमध्ये अनेक कंपन्या सुरू झाल्यामुळे या परिसरात नागरीकरण झाले. या व्यतिरिक्त वाहतुकीच्या सुविधा, सरकारी प्रोत्साहन, सुविधांची उपलब्धता, आर्थिक संपन्नता इ. अनेक कारणांमुळे भारतात नागरीकरण झपाट्याने वाढत आहे.

## <u>भारतीय नागरीकरणाचे परिणाम (Effect of Indian Urbanization)</u>

नागरीकरणाची प्रक्रिया जगभर झपाट्याने चालू आहे. विकसित व विकसनशील देशात तर नागरीकरणाचा वेग फारच आहे. या नागरीकरणास भारतही अपवाद नाही. भारतातही नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे हे आपण पाहिलेच आहे. त्यामागील कारणांचाही अभ्यास केला आहे. भारतात झालेल्या या नागरीकरणाचे काही चांगले तसेच काही वाईट परिणामही दिसून येतात ते पुढीलप्रमाणे -

#### 1.सकारात्मक परिणाम (Positive Effect):

अ.स्थलांतरितांमुळे शहराच्या विकासाला चालना : उद्योगधंद्यांच्या व शहराच्या विकासासाठी कुशल व अकुशल मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणात गरज भासते. नगरांकडे झालेल्या स्थलांतरामुळे हे

मनुष्यबळ शहरात सहज उपलब्ध होते. त्याचा फायदा शहराच्या विकासासाठी होतो. मुंबईमध्ये कोकण व सर्व महाराष्ट्रातून तसेच उत्तर भारतातून आलेल्या मजुरांनी मुंबईच्या विकासात मोठ्या प्रमाणात हातभार लावला, तसेच जगभरातून कुशल तज्ज्ञ अभियंते, डॉक्टर्स, वकील, कलाक्षेत्रातील लोक मुंबईत आल्यामुळे मुंबईचा मोठा विकास झाला आहे.

ब.नागरी भागातील नोकरीच्या संधी शहरातील सुविधा, सरकारचे धोरण, वाहतुकीच्या सुविधा, वीज व पाणीपुरवठा, मजूरांचा पुरवठा या सर्व गोष्टींचा विचार करून वाहतुकीच्या रामध्ये किंवा नगरांच्या जवळपास आपले उद्योगधंदे सुरू करतात. त्यामुळे तेथे जायच्या प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. प्रशासकीय कार्यालये, व्यापारी केंद्रांची निर्मिती, शैक्षणिक सुविधा, करमणूक केंद्र या सर्व गोष्टींमुळे नगरांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. हा नागरीकरणाचा महत्त्वाचा फायदा म्हणता येईल. उदा., मुंबई, पुणे, बेंगलोर, हैद्राबाद येथील विकास.

क.वाहतूक व दळणवळणाच्या सुविधांचा विकास : जेथे नागरीकरण होते तेथे शासनातर्फे वाहतूक व दळणवळणाचे जाळे पसरविले जाते. त्याचा फायदा सर्व व्यवस्थेला होतो. रेल्वे वाहतूक, रस्ते वाहतूक, उड्डाण पूल, मेट्रो लोकल, रेल्वे, विमान सेवा तसेच दूरसंचार, मोबाइल, इंटरनेट अशा सर्व वाहतूक व दळणवळणाच्या सुविधांचा नगरांमध्ये विकास झालेला दिसतो.

ड.शैक्षणिक सुविधा उपलब्ध होतात : नगरांमध्ये शैक्षणिक सुविधांचा विकास होतो. सरकारी, निमसरकारी व खासगी शैक्षणिक संस्था विकसित होतात. विद्यापीठे, वैद्यकीय महाविद्यालये, उच्च व तंत्रशिक्षणाच्या सुविधा नगरांमध्ये उपलब्ध होतात. पुणे शहराच्या विकासात शैक्षणिक सुविधांचा मोठा वाटा आहे. अनेक वर्षांपासून पुणे शहरास विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. आजूबाजूच्या प्रदेशाबरोबरच संपूर्ण देशातून व आंतरराष्ट्रीय विद्यार्थीही शिक्षणासाठी पुण्यात येतात. त्यामुळे येथे शैक्षणिक दृष्टीने विकास झाला आहे.

इ.राहणीमानाचा दर्जा उंचावतो : भारतीय ग्रामीण भागातील गरीब व मागासलेला समाज विविध कारणांनी शहराकडे आल्यामुळे साहजिकच त्यांची आर्थिक उन्नती झाली. परिणामी, त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावला. मुलांसाठी चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्या. वसाहतींची उपलब्धता झाली. बाहेरच्या जगाशी संपर्क आल्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला. भारतीय नागरीकांसाठी हा सर्वांत महत्त्वाचा नागरीकरणाचा परिणाम म्हणता येईल.

**2.नकारात्मक परिणाम (भारतीय नागरीकरणाच्या समस्या) (Negative Effect of Indian Urbanization or Problems of Indian Urbanization):**

अ.अतिरिक्त लोकसंख्येच्या समस्या नगरांच्या होणाऱ्या वाढीचा फायदा काही मयदिपर्यंतच असतो. त्यानंतर मात्र ती समस्या बनते. ग्रामीण भागाकडून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतराचा ओघ सातत्याने राहिल्यामुळे आता भारतीय नगरांमध्ये प्रचंड गर्दी झाली आहे. त्यामुळे अतिरिक्त लोकसंख्येच्या सर्वच समस्या किंवा परिणाम आता भारतीय नागरीकरणास भेडसावत आहेत. सर्व सुविधांवर ताण वाढला आहे.

ब.जमिनीच्या भरमसाट किमती : जसजसे नागरीकरण वाढत जाते तसतशा जमिनीच्या किमती गगनाला भिडतात. भारतातील सर्वच शहरांची ही अवस्था आहे. त्यामुशा उद्योगधंदे बाहेर पडतात. शहराच्या विकासाला मर्यादा येतात. नागरीकांना घरांच्या विमुळे परवडेनाशा होतात व झोपडपट्ट्यांची वाढ सुरू होते. तसेच शहरांची निकोप, निरोगी आडवी बाढ होण्याऐवजी उभी वाढ होऊ लागते. जी शहरासाठी हानिकारक असते.

क.जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यात अडचणी: लोकसंख्येची भरमसाट वाढ, वाहतूक व्यवस्थेमधील नाकेबंदी व यामुळे शहरांना जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यात अडथळे येत आहेत. अन्नधान्य, रॉकेल, गॅस, साखर, भाजीपाला इ. जीवनावश्यक वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण करून भरमसाट किमती वाढविल्या जातात. त्या पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. उदा., दिल्लीमध्ये कांदा व मिठाची टंचाई निर्माण करून सामान्य जनतेस वेठीस धरल्याचे ताजे उदाहरण आहे. अशा वेळेस शासनही हतबल होते.

ड.प्रदूषण : भारतातील जवळजवळ सर्वच शहरांना अति नागरीकरणामुळे ही समस्या भेडसावत आहे. हवा प्रदूषण, जलप्रदूषण, कचऱ्यामुळे प्रचंड वाढलेली दुर्गंधी, ध्वनीप्रदूषण यांमुळे शहरे प्रदूषित व गलिच्छ बनली आहेत. वाहनांची वाढलेली संख्या, त्यामुळे वाहतुकीच्या कोंडीची कायमची समस्या, त्यातून वाढलेले हवा प्रदूषण ही भारतीय शहरांची समस्या बनली आहे. भारताची राजधानी दिल्लीमध्ये प्रदूषित हवा व धुरके यामुळे सम-विषम नंबरची वाहने दिवसाआड रस्त्यावर वाहतुकीसाठी सोडण्याची वेळ आली आहे. शाळांना वेळोवेळी सुट्टी देण्याची वेळ शासनावर आली आहे. गोंगाट प्रचंड वाढला आहे. मुंबई, कोलकाता, हैद्राबाद, पुणे, चेन्नई, चंदीगढ या शहरांची

परिस्थिती काही यापेक्षा वेगळी नाही. थोडक्यात, प्रदूषण ही भारतीय नागरीकरणाची प्रमुख समस्या बनली आहे.

इ.झोपडपट्ट्या किंवा गलिच्छ वस्त्यांची निर्मिती (Rise of Slum Areas) : अति नागरीकरणामुळे प्रशासनाला घरांचे व इतर सुविधांचे नियोजन करणे अशक्यच होते. त्यामुळे नगरांमध्ये झोपडपट्ट्या व गलिच्छ वस्त्यांची निर्मिती होते. भारतातील मुंबई शहर हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. आशिया खंडातील सर्वांत मोठी धारावी झोपडपट्टी मुंबईतच आहे. भारतातील, इतर शहरांचीही अवस्था यापेक्षा वेगळी नाही. गुन्हेगारी, आर्थिक, सामाजिक, आरोग्य, शिक्षण, जीवनावश्यक वस्तूंची कमतरता अशा अनेक समस्या येथे निर्माण झाल्या आहेत.

ई.बेकारी : भारतातील अनेक शहरे ग्रामीण भागातील नोकरीच्या अपेक्षेने आलेल्या नागरीकांनी तुडुंब भरली आहेत. त्यामानाने नागरी भागात आता नोकऱ्या उपलब्ध नाहीत, अनेक अडचणींमुळे कारखानेही बंद पडतात. त्यामुळे नागरी भागात बेकारीची समस्या उग्र रूप धारण करत आहे.

## भारतीय नागरीकरणाच्या समस्येवरील उपाय

भारतातील नागरीकरण दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. त्यामुळे नागरी जीवनाच्या समस्यांचा विचार करून त्यासाठी पुढील काही उपाययोजना राबविता येतील.

1.खेड्यांकडे चला भारत हा खेड्यांमध्ये वसलेला देश आहे. भारताचा विकास करावयाचा असेल तर खेड्यांचा विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी खेड्यांकडे चला हा महात्मा गांधीजींचा विचार प्रत्यक्षात उतरविणे गरजेचे आहे. नागरी जीवनाच्या समस्येवर तोडगा म्हणून काही लोकांनी शहरे सोडून पुन्हा खेड्याकडे जावे असे विद्वानांचे मत असून त्यांचे म्हणणे असे आहे की, शहरांच्या अवाजवी वाढीवरील हीच योग्य उपाययोजना आहे.

2.उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण : भारताचा औद्योगिक विकास काही ठरावीक शहरांमध्येच झालेला दिसतो. दिल्ली, चंदीगढ, मुंबई, पुणे, सुरत इत्यादींमुळे साहजिकच येथेच विविध उद्देशांनी लोकसंख्या केंद्रित होते व भरमसाट नागरीकरण वाढते. याऐवजी हेतुपुरस्सर नियोजन करून ग्रामीण भागात उद्योगधंद्यांचा विकास करणे गरजेचे आहे- जेणेकरून नागरीकरणाची समस्या नियंत्रणात येईल.

3.प्रादेशिक नियोजन : अति वाढलेल्या शहरांच्या सभोवतालच्या प्रदेशात उपनगरे आणि नवीन शहरे वसविण्याच्या दृष्टिकोनातून प्रादेशिक नियोजन गरजेचे आहे. या नवीन शहरांमध्ये सर्व सुविधा पुरविणे गरजेचे आहे. वेळोवेळी शहरांचे तयार झालेले आराखडे तपासून पाहणे गरजेचे असते. संपूर्ण देशाचा व प्रदेशाचा विचार करून नियोजन- पूर्वक विकास करणे गरजेचे आहे. काही प्रदेशाला नैसर्गिकरीत्याच सुलभता मिळते. त्यामुळे तेथेच उद्योगधंदे, व्यापार, मनोरंजन, पर्यटन, शैक्षणिक सुविधा या गोष्टींना चालना मिळते. त्यामुळे तेथे नागरीकरण वाढते व प्रादेशिक असमतोल निर्माण होतो. असे होऊ नये म्हणून नियोजन महत्त्वाचे आहे.

4.नैसर्गिक लोकसंख्यावाढीवर नियंत्रण: भारतात लोकसंख्यावाढीचा द फारच जास्त आहे. नागरीकरणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. या वाढत्य नागरीकरणात शहरांतील आलेल्या स्थलांतरितांमध्ये आणखी लोकसंख्येची नैसर्गिक वा भर घालत आहे. त्यामुळे नगरांची लोकसंख्या झपाट्याने वाढून नागरीकरणाच्या समस्य वाढत आहेत. यासाठी नैसर्गिक लोकसंख्यावाढीवरही नियंत्रण आणणे गरजेचे आहे.

5.नागरी जमिनीवर सामाजिक नियंत्रण: भारतीय कायद्यानुसार जमिनीव सामाजिक नियंत्रण आहे. हेतुपुरस्सर एखाद्या ठिकाणी शहर किंवा उद्योगधंद्यांचा विकास करावयाचा असेल तर जमिनीचे संपादन करणे गरजेचे असते. या जमिनीचे संपादन बाजारभावाप्रमाणे पैसे देऊन करण्यांचे अधिकार नियोजन अधिकाऱ्यांना द्यावेत. त्याचप्रमाणे याची खरेदी किंमत भविष्यकाळात व्यापार किंवा घरबांधणीच्या किमती विचारात घेऊन ठरविली जाऊ नये. भविष्यकालीन उपयोजनेनुसार ज्या ठिकाणी जमिनीच्या किमती वाढतात तेथे मालकाकडून जमीन सुधारणेचा खर्च वसूल केला पाहिजे.

6.झोपडपट्ट्यांवर नियंत्रण भारतीय नागरीकरणात झोपडपट्ट्यांतील नागरीकरणाचा मोठा सहभाग आहे. जो अत्यंत चुकीचा आहे. भारतीय ग्रामीण भागातील गरीब, दरिद्री, बेकार लोकसंख्या कामधंद्याच्या व पोटापाण्याच्या उद्देशाने, शेतीच्य अनिश्चिततेने शहराकडे स्थलांतरित होतात. शहरातील घरांच्या किमती न परवडल्यामुळे झोपडपट्ट्यांची बेसुमार वाढ होते व नागरीकरणाची समस्या निर्माण होते. या वाढत्य झोपडपट्ट्यांवर नियंत्रण मिळविणे हा एक महत्त्वाचा उपाय आहे.

7.नवीन शहरांचे नियोजन नवीन औद्योगिक शहरांचे नियोजन सांघिक पद्धतीने केले पाहिजे. भारतातील भिलाई, दुर्गापूरसारखी पोलाद शहरे आणि मुंबईवरील ताण कमी करण्यासाठी उभारली जात असलेली नवी मुंबई ही याची उदाहरणे आहेत. अशीच शहरे दूर ग्रामीण भागात प्रत्येक राज्यात

उभी राहणे गरजेचे आहे. जेणेकरून प्रादेशिक विकासाचा समतोल राखला जाईल व नागरीकरणाच्या समस्याही भेडसावणार नाहीत.

वरील स्वरूपाचे काही उपाय योजून भारतातील नागरीकरणाच्या समस्या सोडविण्यास मदत होईल.

## महाराष्ट्रातील नागरीकरण (Urbanization in Maharashtra)

महाराष्ट्रातील नागरीकरणाचा भारताच्या दृष्टिकोनातून विचार करावयाचा झाल्यास हे एक जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे असेच म्हणावे लागेल. महाराष्ट्राच्या नागरीकरणाला प्राचीन काळापासूनची पार्श्वभूमी आहे. जेव्हा सिंधू नदीच्या खोऱ्यात मोहेंजोदोडो व हडप्पां ही नगरे विकसित झाली होती. त्याच काळादरम्यान महाराष्ट्रात प्रवरा नदीच्या काठावर जोर्वे व दायमाबाद (सध्याचे लाडगाव) ही नगरे विकसित झालेली होती. ख्रिस्तपूर्व काळात सोपारा, पैठण, जुन्नर ही नगरे अस्तित्वात असल्याचे पुरावे आहेत. विविध राज्यांच्या राजधान्या त्या काळातही विकसित झालेल्या होत्या. औरंगाबाद जिल्ह्यातील यादवांनी विकसित केलेले देवगिरी, राष्ट्रकूटांनी अमरावती जिल्ह्यात विकसित केलेले अचलपूर, 12 व्या शतकात सिल्हारा राजघराण्याने विकसित केलेले कोल्हापूर, शालिवाहनांनी विकसित केलेले राजधानीचे नगर पैठण इत्यादी महाराष्ट्रातील नगरे प्रसिद्ध होती. त्यानंतर व्यापार, प्रशासन व संरक्षणाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील नगरांचा विकास झाला. निजामाच्या काळात अहमदनगर शहर वसले. गाविलगड, दौलताबाद, माहूर, बीड जिल्ह्यातील परांडा, उस्मानाबादमधील नळदुर्ग, पन्हाळा, पुणे, सातारा ही महत्त्वाची शहरे विकसित झाली. इंग्रजांच्या काळातही व्यापार व प्रशासनाच्या दृष्टीने तसेच लष्करी छावण्यांमुळे काही नगरांचा विकास झाला. 20 व्या शतकाच्या सुरुवातीपासून महाराष्ट्रातील नागरीकरणास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

महाराष्ट्राचे नागरीकरण समस्या, परिणाम आणि उपाय या मुद्द्यासाठी भारताचे नागरीकरण या मुद्याचा संदर्भ पहावा.